**गणेश जालींदर चव्हाण वि. महाराष्ट्र शासन**
**(CNR NO. MHBU20-000132-2026)**

## नि.क्र. १ खाली आदेश
**(पारीत दिनांक ०२ एप्रिल २०२६)**

०१] प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८३ अन्वये नियमित जामीन मिळण्याकामी दाखल केला आहे.

०२] अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादी/पीडित हिने पोलीस ठाणे, लोणार येथे रिपोर्ट दिला की, सन २०२२ मध्ये तिचे आणि आरोपी गणेश यांचे प्रेम संबंध जुळून आले. आरोपी लोकांनी तिला गणेश आत्महत्या करेल अशी धमकी देऊन जबरदस्तीने तिचे लग्न आरोपी गणेश सोबत लावून दिले. लग्नानंतर आरोपी गणेश याने पीडितेच्या मनाविरूद्ध ती अल्पवयीन असतांना तिच्यासोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. आरोपी लोकांनी पीडितेला शारीरिक व मानसिक त्रास दिल्याने तिचा गर्भपात झाला. म्हणून तिने पोलीस ठाणे, लोणार येथे आरोपींविरूद्ध फिर्याद दिली.

०३] अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. व्ही. डी. नरवाडे यांनी युक्तिवाद केला की, पीडित व आरोपी गणेश यांचे लग्न दिनांक ०५.०२.२०२५ रोजी विधिवत झाले असून ती गणेश याच्या पासून गर्भवती होती. लग्नाचे फोटो दाखल करण्यात येऊन त्यामध्ये पीडितेचे आई-वडील, नातेवाईक व इतर लोकं हजर असल्याचे दिसून येते. घरगुती भांडणामुळे पीडितेने अर्जदाराविरूद्ध खोटी केस केली. लग्नाच्या वेळेस अर्जदाराला पीडितेच्या वयाची माहिती नव्हती. घटनेच्या वेळेस पीडितेला चांगल्या वाईट गोष्टीचे ज्ञान होते. अर्जदार हा विद्यार्थी असून शिक्षण घेत आहे. अर्जदार हा दिनांक ०९.०३.२०२६ पासून तुरूंगाधीन आहे. अर्जदाराकडून काहीही जप्त करायचे नसल्याने त्याच्या कोठडीची आवश्यकता राहिलेली नाही. अर्जदाराने कोणताही अपराध केलेला नाही. अर्जदार तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. शिवाय अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यांस तयार आहे. त्यामुळे अर्जदाराला जामीनावर सोडण्याची विनंती करण्यांत आली.

०४]  याउलट, विद्वान सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. हिवाळे यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, आरोपी लोकांनी पिडीता अल्पवयीन असल्याची माहिती असतांना देखील तिचा बालविवाह आरोपी गणेश याच्या सोबत जबरदस्तीने लावून दिला. तसेच आरोपी लोकांनी बालविवाहाची माहिती लपवून ठेवली. त्यामुळे अर्जदाराला जामिन दिल्यास तो साक्षीदारांवर दबाव आणून त्यांना फितूर करु शकतो. अर्जदार तपासात अडथळा निर्माण करू शकतो व पीडतेला त्रास देऊ शकतो. म्हणून अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती अभियोग पक्षातर्फे करण्यात आली.

०५]  पीडितेला वारंवार नोटीस काढूनही ती गैरहजर आहे. नगर सेवक, लोणार यांनी फिर्यादी/ पीडित मुंबई, पुणे येथे कामधंद्यासाठी गेली असल्याचा रिपोर्ट दिला. त्यामुळे दोन्ही पक्षाचा युक्तिवाद पीडितेच्या गैरहजेरीत ऐकण्यात आला.

०६]  दोन्ही पक्षाचा युक्तीवादाच्या अनुषंगाने केस पेपरची पाहणी केली असता असे दिसून येते की, पिडीता ही आरोपी क्र. १ गणेश याची पत्नी आहे. फिर्यादीनुसार अर्जदार व पीडित यांचे प्रेम संबंध असून त्यांच्यात विधीवत विवाह झालेला आहे. लग्नाचे फोटोवरून पीडितेचे आई वडील अर्जदार व पीडितेच्या लग्न समारंभास हजर आहे. मागच्या अर्जावरील पीडितेच्या म्हणण्यानुसार तिला त्रास दिल्याने तिचा गर्भपात झाला. म्हणून तिने आरोपींविरूद्ध फिर्याद दाखल केली. अभियोग पक्षाच्या कथेनुसार घटनेच्या वेळेस फिर्यादीचे वय १६ वर्ष पेक्षा जास्त होते, त्यामुळे तिला बऱ्या वाईट गोष्टीची जाणीव होती हे नाकारता येत नाही. त्यामुळे या सर्व बाबी बचाव पक्षाच्या युक्तिवादाचे समर्थन करतात.

०७]  अर्जदार हा दिनांक ०९.०३.२०२६ पासून तुरूंगाधीन आहे. अर्जदाराच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण तपास संपलेला आहे. त्यामुळे त्याच्या अधीक कोठडीची आवश्यकता राहिलेली नाही. अर्जदार हा तरूण असून त्याच्या घरातील कर्ता पुरूष आहे. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदार तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. अभियोग पक्षाला असलेली भीती व साक्षीदारांचे संरक्षण कठोर अटी व शर्ती लादून केल्या जाऊ शकते. म्हणून प्रकरणातील तथ्य परिस्थिती, गुन्ह्याचे गांभीर्य,

अर्जदाराचे कृत्य व तपासाची स्थिती पाहता अर्जदार सशर्त जामीन मिळवण्यास पात्र आहे. करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**– आ दे श –**

**०१]** नियमित जामीन अर्ज क्र. ६१/२०२६ मंजूर करण्यात येतो.

**०२]** अर्जदार **– गणेश जालींधर चव्हाण** याला पोलीस ठाणे, लोणार येथील अपराध क्र. ३४५/२०२५, कलम ६४(१), ६४(२)(आय), ६४(२)(एम), १२७(१), ११५(२), ३५१(२), ३५२ सह कलम ३(५) भारतीय न्याय संहिता, कलम ४, ६, ८, १२ बालकांचे लैंगीक अपराधापासून संरक्षण अधिनियम आणि कलम ९, १०, ११ बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, खालील गुन्ह्यात त्याचे वैयक्तिक रू. ५०,०००/– चे बंधपत्र व सदर रकमेचा जामीनदार दिल्यानंतर जामीनावर सोडण्यात यावे.

**०३]** अर्जदाराने अभियोग पक्षाच्या साक्षीदारांवर दबाव आणू नये किंवा साक्षीदारांना कोणत्याही स्वरूपाचे प्रलोभन दाखवून फितूर करू नये.

**०४]** अर्जदाराने पोलीस ठाणे, लोणार येथे दर शनिवारी सकाळी १०.०० ते १२.०० वाजेचे सुमारास तपासाकामी दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत हजर राहावे.

**०५]** अर्जदाराने यापुढे कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा करु नये.

**०६]** अर्जदाराने वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास त्याची जमानत रद्द करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.04.04 17:19:55 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**विशेष न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – ०२.०४.२०२६**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – ०२.०४.२०२६